मुंबई विद्यापीठ

क्र.आस्था.२(४)/EST/ICC/2013-14/27/२०१४

परिपत्रक :—

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख, यांना कळविण्यांत येते की, शासन निर्णय क्र.संकीर्ण—२०१०/(६८७/१०)/विशी—१ दिनांक ५ जानेवारी, २०११ नुसार विद्यापीठातील कर्मचा—यांना कार्यालयीन उपस्थितीसाठी संगणकीय नोंदणी प्रणाली (Bio-Metric System) अनिवार्य करण्यांत आली असून त्यानुसार विद्यापीठातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा—यांना कार्यालयीन परिपत्रक क्र. GAD/ICM/2012-13/320/2012 दिनांक १८जून, २०१२ अन्वये कळविण्यांत आले आहे.

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख, यांना कळविण्यात येते की, **विद्यापीठामध्ये संगणकीय प्रणाली व्दारा 'रजा नोंदणी' तसेच 'सेवा पुस्तकातील नोंदणी' (E-Service Book & E-Leave) करावयाची आहे. (सदर नोंदणी मासिक वेतनासोबत जोडण्यात येणार आहे.) त्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा—यांना प्रशिक्षण देण्यात येईल. सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा—यांनी रजा घेण्यापुर्वी मंजुर करावयाची असल्याने घेतलेल्या रजेचे अर्ज त्वरीत आस्थापना /शिक्षक नियुक्ती विभागात सादर करावे, जेणे करून सदर नोंदी घेणे सोयीचे होईल. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा—यांनी** आगाऊ **अर्ज सादर न केल्यास त्या दिवसाची रजा विनावेतनी (L.W.P) म्हणून समजण्यात येईल व वित्त व लेखा विभागास योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल** सदर बाब संबधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा—यांच्या निदर्शनास आणावी.

कुलसचिव

मुंबई—४०००३२.

११ फेब्रुवारी, २०१४.

प्रति,

विद्यापीठातील विभागाचे संचालक/विभाग प्रमुख,
सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल,
परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी,
सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामग्री,
विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि
कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख.